दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६०१२०६
२५६०१२०१
२५६०१२०२
फॅक्स : ०२०-२५६९१३४१


# पुणे विद्यापीठ


**परीक्षा विभाग**
**गणेशखिंड, पुणे ४११ ००७**

Website : www.unipune.ac.in
E-mail : coe@unipune.ac.in


## अत्यंत महत्वाचे

संदर्भ: परीक्षा/समन्वय/२५०　　　　　　　　　　　　　　　　दिनांक: ०३ मार्च, २०११

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संलग्नित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये.

**विषय : प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान परीक्षा, उत्तरपत्रिका, अध्यादेश इत्यादिबाबत..**

महोदय / महोदया,

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, प्रथम वर्ष कला, ललितकला, मानसनीती व समाजविज्ञान, वाणिज्य, विज्ञान, विज्ञान (संगणक) व विज्ञान (जैवतंत्रज्ञान) या अभ्यासक्रमाच्या परीक्षा शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून महाविद्यालयाकडे वर्ग केल्या असल्याचे संदर्भ क्र.परीक्षा/ समन्वय/१६३३, दिनांक २४ नोव्हेंबर, २००९ व परीक्षा/समन्वय/१६३, दिनांक २ फेब्रुवारी, २०१० च्या पत्रान्वये आपणांस यापूर्वीच कळविण्यात आलेले आहे. सदर परीक्षा महाविद्यालयाकडे वर्ग केल्यानंतर करावयाच्या कामकाजाबाबतच्या सविस्तर सूचना सदर पत्रान्वये व वेळोवेळी करण्यात आलेल्या आहेत. असे असूनसुध्दा ब-याच महाविद्यालयांकडून कोणत्या उत्तरपत्रिका परीक्षेसाठी वापरावयाच्या याबाबत दूरध्वनीवरुन विचारणा होत आहे.

महाविद्यालयांकडे प्रथम वर्षाच्या वरील परीक्षा वर्ग केल्यानंतर **नियमित विद्यार्थ्यांच्या** परीक्षेसाठी महाविद्यालयाचे नाव व अनुक्रमांक असलेल्या उत्तरपत्रिका महाविद्यालयाने छापून घेवून त्याचा वापर परीक्षेसाठी करावयाचा आहे. प्रथम वर्ष कला, ललितकला, मानसनीती व समाजविज्ञान आणि वाणिज्य या परीक्षेसाठी बहि:स्थ विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली असल्यामुळे व त्यांच्या उत्तरपत्रिका विद्यापीठामार्फत नेहमीप्रमाणे केंद्रिय मूल्यमापन प्रकल्पांतर्गत तपासून निकाल लावण्यात येणार आहे. तरी प्रथम वर्ष कला व वाणिज्यच्या **बहि:स्थ विद्यार्थ्यांच्या** परीक्षेसाठी विद्यापीठाने पुरविलेल्या उत्तरपत्रिकांचा वापर करुन सदर उत्तरपत्रिका नेहमीप्रमाणे केंद्रिय मूल्यमापन प्रकल्पाच्या ठिकाणी पाठवावयाच्या आहेत.

प्रथम वर्षाचा निकाल जाहीर करताना विद्यापीठाचे विविध अध्यादेश उदा. अध्यादेश क्र. १, २, ४, १६३, १८२ इत्यादि लागू करण्यात यावेत. तसेच ज्या महाविद्यालयांना परीक्षा केंद्र म्हणून मान्यता मिळालेली नाही त्यांनी परीक्षा केंद्रास मान्यतेबाबतचा प्रस्ताव विद्यापीठास सादर करावयाचा आहे. (सुधारीत परिपत्रक क्र. १२४, दिनांक ९ जुलै, २०१०) अन्यथा त्यांच्या विद्यार्थ्यांची परीक्षा अन्य महाविद्यालयात घेण्यात येईल व याबाबतही संबंधित महाविद्यालयाची संमती परीक्षा विभागास कळवावी.

आपणांस विनंती की, या पत्राचा आशय सर्व संबंधित शिक्षक, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी व इतर सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ.शि.मो.आहिरे)
परीक्षा नियंत्रक